सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९५८ चा मुंबई अधिनियम, क्रमांक ७८

# न्यायदानविषयक अधिकारी संरक्षण (मुंबई राज्याच्या हैदराबाद आणि सौराष्ट्र प्रदेशांना लागू करण्याबाबत) अधिनियम, १९५८

(दिनांक १८ नोव्हेंबर २००६ पर्यंत सुधारित)

# Bombay Act No. LXXVIII of 1958

## The Judicial Officers' Protection (Extension to Hyderabad and Saurashtra Areas of Bombay State) Act, 1958

*(As modified upto 18th November 2006)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद यांनी मुद्रित केले व संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

२००६.

[ किंमत : रुपये २ - ००]

# न्यायदानविषयक अधिकारी संरक्षण (मुंबई राज्याच्या हैदराबाद आणि सौराष्ट्र प्रदेशांना लागू करण्याबाबत) अधिनियम, १९५८

## अनुक्रमणिका

~~उद्देशिका~~


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव ... | १ |
| २. | सन १८५० चा अधिनियम १८ वा मुंबई राज्याच्या हैदराबाद व सौराष्ट्र प्रदेशांना लागू करणे. ... | १ |
| ३. | निरसित करणे आणि बचाव ... | १ |

# सन १९५८ चा मुंबई अधिनियम, ७८[1]

## न्यायदानविषयक अधिकारी संरक्षण (मुंबई राज्याच्या हैदराबाद आणि सौराष्ट्र प्रदेशांना लागू करण्याबाबत) अधिनियम, १९५८

### न्यायदानविषयक अधिकारी संरक्षण अधिनियम, १९५८, हा मुंबई राज्याच्या हैदराबाद व सौराष्ट्र प्रदेशांना लागू करण्याबाबत अधिनियम

**ज्याअर्थी,** न्यायदानविषयक अधिकारी संरक्षण अधिनियम, १८५०, हा दिनांक १ नोव्हेंबर, १९५६ च्या लगतपूर्वी भाग ब राज्यात समाविष्ट असलेले प्रदेश खेरीज करुन सबंध मुंबई राज्यात अंमलात आहे ;

**आणि ज्याअर्थी,** राज्याच्या हैदराबाद प्रदेशात नाजिम व सेवक संरक्षण अधिनियम अंमलात आहे आणि सौराष्ट्र प्रदेशात सौराष्ट्र राज्य (केंद्रीय व मुंबई अधिनियम लागू करण्याबाबत) अध्यादेश, १९४८ वरुन अनुकूल व लागू केलेला न्यायदानविषयक अधिकारी संरक्षण अधिनियम, १८५०, हा अंमलात आहे ;

**आणि ज्याअर्थी,** मुंबई राज्याच्या उरलेल्या भागात अंमलात असल्याप्रमाणेचा न्यायदानविषयक अधिकारी संरक्षण अधिनियम, १८५०, हा त्या राज्याच्या हैदराबाद व सौराष्ट्र प्रदेशांनाही लागू करणे व त्यात अंमलात आणणे आणि परिणामतः पुर्वोक्त तत्सम विधि रद्द करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या नवव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव

**१.** या अधिनियमास, न्यायदानविषयक अधिकारी संरक्षण (मुंबई राज्याच्या हैदराबाद आणि सौराष्ट्र प्रदेशांना लागू करण्याबाबत) अधिनियम, १९५८, असे म्हणावे.

सन १८५० चा अधिनियम १८ वा मुंबई राज्याच्या हैदराबाद व सौराष्ट्र प्रदेशांना लागू करणे.

**२.** मुंबई राज्याच्या उरलेल्या भागात अंमलात असलेला न्यायदानविषयक अधिकारी संरक्षण अधिनियम, १८५०, हा याद्वारे मुंबई राज्याच्या हैदराबाद व सौराष्ट्र प्रदेशांना लागू करण्यात येत आहे आणि अशा रीतीने लागू केल्यामुळे तो त्या प्रदेशात अंमलात येईल.

निरसित करणे आणि बचाव.

**३.** मुंबई राज्याच्या हैदराबाद प्रदेशास लागू असलेला नाजिम आणि सेवक संरक्षण अधिनियम आणि सौराष्ट्र राज्य (केंद्रीय व मुंबई अधिनियम लागू करण्याबाबत) अध्यादेश, १९४८, याद्वारे राज्याच्या सौराष्ट्र प्रदेशास अनुकूल व लागू केलेला न्यायदानविषयक अधिकारी संरक्षण अधिनियम, १८५०, हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे :

---

१. उद्देश व कारणे यांच्या विवरणाकरिता मुंबई शासन राजपत्र, १९५८, भाग ५, पृष्ठ क्र. ४०४ पहा.

परंतु, अशा रीतीने ती निरसित केल्यामुळे,—

(क) अशा रीतीने निरसित केलेल्या अधिनियमांच्या पूर्व अंमलास,

(ख) अशा रीतीने निरसित केलेल्या अधिनियमान्वये संपादन केलेला, मिळालेला किंवा प्राप्त झालेला कोणताही हक्क, विशेषाधिकार, बोजा किंवा जबाबदारी यास,

(ग) असा कोणताही हक्क, विशेषाधिकार, बोजा किंवा जबाबदारी यांच्या संबंधातील कोणत्याही चौकशीस, वैध कार्यवाहीस किंवा उपाययोजनेस बाध येणार नाही आणि जणू हा अधिनियम संमत झाला नसल्याप्रमाणे अशी कोणतीही चौकशी, वैध कार्यवाही किंवा उपाययोजना करण्याचा, चालू ठेवण्याचा किंवा अंमलात आणण्याचा अधिकार आहे.

शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद

शा. मु. औ. (एच) ३११-६०५०-१२-२००६.